माजी सैनिकांना सेवेत राखीव पदे ठेवण्याबाबत राज्य सैनिक मंडळ आणि जिल्हा सैनिक मंडळे यांना द्यावयाच्या अधिकाराबाबत.

---

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक -आरटीए-१०८२-१५३६-सीआर-३६-१६अ,
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- ९ जून, १९८२.

वाचा :- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीए-१०७५-१२४८-१२६३-१६, दिनांक ५/८/१९७६.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आयपीई-१०८०-०-१८१-१६अ, दिनांक १०/१०/१९८०.

## शासन निर्णय

सरळ सेवा प्रवेशाने भरण्यासाठी वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये प्रतिवर्षी जी पदे उपलब्ध होतील त्यापैकी १५% पदे माजी सैनिकांसाठी १९७३ पासून राखून ठेवण्यात यावीत असे आदेश सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०७३/व्ही, दिनांक ८/५/१९७३ आणि ८/१०/१९७३ रोजी काढले होते. या १५% पदांवर माजी सैनिकांची नावे नियुक्ती अधिकाऱ्यांकडे पुरस्कृत करण्याचे अधिकार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीए-१०७५-१२४८-१२६३-१६, दिनांक ५/८/१९७६ अन्वये विविध सेवायोजन कार्यालयांना देण्यात आले आहेत. वर नमूद केलेल्या शासन निर्णय, दिनांक ५/८/१९७६ मधील आदेशाचा फेरविचार करून शासन आता असे आदेश देत आहे की, १५ % राखीव ठेवलेल्या पदांवर माजी सैनिकांना निवृत्तीसाठी पुरस्कृत करण्याचे सध्याचे सेवायोजन कार्यालयांचे अधिकार काढून घेण्यांत आले असून यापुढे राज्य सैनिक मंडळ, पुणे / जिल्हा सैनिक मंडळ यांना देण्यांत येत आहेत.

यापुढे राज्यातील विविध विभागातील नियुक्ती अधिकाऱ्यांनी माजी सैनिकांसाठी असलेली १५% वर्ग ३ व वर्ग ४ ची पदे तसेच, जी पदे लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येत नाहीत आणि जेथे एक वर्षपेक्षा जास्त नाहीत अशा मुदतीची रिक्त पदे (Temparary vacancies not exceeding one year's duration) आहेत अशी पदे भरताना खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

अ) माजी सैनिकांठी १५ टक्के असलेल्या जागा त्या त्या जिल्हा सैनिक मंडळाकडे किमान १५ दिवस अगोदर अमेदवार पुरस्कृत करण्यासाठी कळविण्यांत याव्या.

ब) एकूण जागांपैकी किती तात्पुरत्या जागा माजी सैनिकांसाठी राखून ठेवल्या आहेत, याचा मागणीपत्रात स्पष्ट उल्लेख करावा. क) जेव्हा राखीव जागेसाठी जिल्हा सैनिक मंडळ योग्य तो उमेदवार पाठवू शकत नसेल तर, त्या जागेसाठी मागणीपत्र सचिव, राज्य सैनिक मंडळ, पुणे यांजकडे पाठविण्यांत यावे. सचिव, राज्य सैनिक मंडळ हे या मागणीनुसार त्या उमेदवारांची नावे संबंधित नियुक्ती अधिकाऱ्यांकडे पुरस्कृत करतील.

ड) तांत्रिक स्वरुपाच्या ज्या जागा जिल्हा संवर्गाव्यतिरिक्त आहेत अशा जागांसाठी सचिव, राज्य सैनिक मंडळ, पुणे यांजकडे मागणीपत्र पाठवावे. या सदंर्भात सचिव, राज्य सैनिक मंडळ, सर्व जिल्हा सैनिक मंडळाकडे योग्य त्या उमेदवारांसाठी विचारणा करतील आणि माजी सैनिकांची नांवे पुरस्कृत करतील.

इ) नियुक्ती अधिकाऱ्यांनी सैनिक मंडळाने पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नियुक्ती केली आहे किंवा यासंबंधीची माहिती एक महिन्यात त्या त्या जिल्हा सैनिक मंडळास पाठवावी. जर एखादी जागा माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या सैनिक मंडळ पुरस्कृत उमेदवारांमधून भरण्यात आली नसेल, तर त्या बाबतची कारणे नियुक्ती अधिकाऱ्यांनी त्या त्या सैनिक मंडळास कळवावीत.

३. माजी सैनिकांसाठी वर्ग ३ मधील राखीव जागा प्रादेशिक निवड मंडळे किंव विशेष निवड मंडळे यांच्यामार्फत सरळ सेवा प्रवेशाने भरावयाच्या असतील त्याबाबत प्रादेशिक निवड मंडळाने/विशेष निवड मंडळाने संबंधित सर्व जिल्ह्यातील जिल्हा सैनिक मंडळे आणि राज्य सैनिक मंडळे, पुणे यांना कळवावे. जिल्हा सैनिक मंडळांनी योग्य असे माजी सैनिक उमेदवार त्या त्या मंडळाकडे त्यांच्या जाहिरातीनुसार राखीव जागांसाठी पुरस्कृत करावेत.

---

कारगिल प्रिंटर्स, सातारा/२७७७९.

४. वरील परिच्छेद २ व ३ प्रमाणे शासनाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेली महामंडळे/प्राधिकरण/मंडळे/जिल्हा परिषदा आणि इतर संस्था यामधील वर्ग ३ व वर्ग ४ मधील १५ टक्के राखीव पदे भरण्यासाठी त्यांनी जिल्हा सैनिक मंडळ व राज्य सैनिक मंडळ, पुणे यांचेशी संपर्क साधावा, आणि सदर मंडळांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांमधून व जी पदे प्रादेशिक निवड मंडळाच्या कक्षेत येत असतील ती प्रादेशिक निवड मंडळामार्फत भरावतील.

५. सचिव, महाराष्ट्र राज्य सैनिक मंडळ, पुणे यांना सर्व जिल्ह्यातील सैनिक मंडळांनी माजी सैनिकांच्या सेवेतील भरतीबाबत त्रैमासिक अहवाल सादर करावेत. सचिव, महाराष्ट्र राज्य सैनिक मंडळ , पुणे यांनी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे दर तीन महिन्यांनी म्हणजेच ३१ मार्च ,३० जुन, ३० सप्टेंबर आणि ३१ डिसेंबर या कालावधीसाठीचे अहवाल खालील मुद्दे लक्षात घेऊन अनुक्रमे ३० एप्रिल, ३१ जुलै, ३१ ऑक्टोबर व ३१ जानेवारीपर्यंत पाठवावेत.

१) वर्ग ३ व वर्ग ४ मधील राखीव पदांसाठी पात्र अशा माजी सैनिकांची नोंदलेली संख्या.

२) वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदांसाठी विविध नियुक्ती अधिकाऱ्यांकडून आलेली एकूण मागणीपत्रे,

३) १५ टक्के राखीव पदांसाठी वरील क्र.२ येथील मागणीपत्रांच्या संदर्भात पुरस्कृत केलेल्या वर्ग ३ व वर्ग ४ मधील माजी सैनिकांची संख्या.

४) माजी सैनिकांना देण्यांत आलेल्या एकूण नियुक्त्या.

६. हे आदेश शिक्षण व सेवायोजन विभागाशी विचारविनिमय करून काढण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-

उपसचिव, महाराष्ट्र शासन.

कारगिल प्रिंटर्स, सातारा/२७७७९.